**उलटतपास शपथेवर प्रतिवादी क्र.४—अ व ब, ७ आणि ८ यांच्यातर्फे श्री ए. डी. देशपांडे, विधीज्ञ यांचेमार्फत.**

१८. दत्तकपत्रक नि.क्र.१३१ मधील मजकूर मी माहित करून घेतला आहे. हे म्हणने खरे आहे की, सदरहू दत्तकपत्रकामधील दोन्ही साक्षीदार नामे, प्रभाकर कृष्णराव देशपांडे व शंकर नरसिमलू सिंगेवार हे दोघेही आदिवासी नाहीत. सदरहू दत्तकपत्रकामधे कथित दत्तक विधानाचा कार्यक्रम कोणत्या गावी झाला, ते नमूद नाही. तसे नमूद का नाही, यामागिल कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणने खरे नाही की, सदरहू प्रकारचा दत्तक विधान कार्यक्रम झाला नाही आणि त्यामूळेच दत्तकपत्रकामधे गावाचे नाव नमूद नाही व त्यातील साक्षीदार आदिवासी नाहीत. पोतीबाई हिस लिहिता वाचता येत नव्हते. ती हाताचा निशाणी अंगठा करीत होती.

१९. माझे वडीलांचे नाव सोनु अय्या दडांजे असे होते. हे म्हणने खरे नाही की, माझे वडील पोतुबाईकडे सालदार म्हणून काम करीत होते. सन १९७६ मधे मारेगाव व झरी हे दोन्ही तालूके नव्हते. त्यामूळे, कोणत्याही कामासाठी वणी येथे जावे लागे. हे म्हणने खरे नाही की, माझे वडील सोनु दलांजे हे पोतुबाईचे नातेवाईक नाहीत. हे म्हणने खरे नाही की, तेव्हा माझे वडीलांनी पोतुबाई हिस शेतीवर कर्ज घेण्याकामी गहाणखत करावयाचे आहे, असे म्हणून वणीला आणले होते. हे म्हणने खरे नाही की, माझे वडीलांनी पोतुबाईसोबत धोकादारी करून आणि सदरहू ओळखीचे साक्षीदार व दुय्यम निबंधक यांच्यासोबत संगनमत करून दत्तकपत्र नि.क्र.१३१ हा खोटा दस्त तयार केला. हे म्हणने खरे नाही की, सदरहू दस्त खोटा असल्यामूळेच त्याआधारे माझे नावामधे बदल करण्याची कार्यवाही आजपावेतो केली नाही. हे म्हणने खरे नाही की, सदर दस्त खोटा असल्यामूळेच त्यामधे दत्तकविधानासाठी वापरलेल्या रूढी व पंरपरेचा उल्लेख नाही व आमच्या समाजाचे कोण ईसम हजर होते, याचाही त्यात उल्लेख नाही. हे म्हणने खरे नाही की, आमचे कोलाम समाजामधे दत्तकविधान करता येत नाही व कधीही होत नाही.

२०. हे म्हणने खरे आहे की, सदरहू दत्तकपत्र झाले तेव्हा पोतुबाईचा

नवरा जिवंत नव्हता. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, पोतुबाईचा नवरा भिमाने मला सदरहू दत्तकपत्र होण्यापूर्वी एक वर्षाअगोदर व मयत होण्यापूर्वी 'नातू' म्हणून दत्तक ठेवले होते. हे म्हणने खरे नाही की, मला दत्तक घेतल्याचे मी सपेशल खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की, दत्तकपत्र नि.क्र.१३१ खोटा दस्त आहे.

२१. हे म्हणने खरे आहे की, मी पोतुबाईविरूद्ध दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मारेगाव या न्यायालात दावा मिळकत गट क्र.३० बाबत वाटप व स्वतंत्र ताबा मागणीकरिता नियमीत दिवाणी दावा क्र.२२/२००७ दाखल केला होता. हे म्हणने खरे नाही की, सदर दिवाणी दाव्यात पोतुबाई हजर झाली होती व तिने लेखी कैफियत दाखल करून मी दत्तकपुत्र असल्याचे नाकारले होते. हे म्हणने खरे नाही की, पोतुबाईने माझा लेखी कैफियतीद्वारे सदरहू दावासुद्धा नाकारला होता. हे म्हणने खरे आहे की, सदर दिवाणी दाव्यात साक्ष देण्याकामी मी हजर न झाल्यामूळे तो दावा दिनांक १८.१२.२००७ रोजी खारीज झाला. हे म्हणने खरे आहे की, मला आता दाखविलेल्या प्रमाणीत प्रत नि.क्र.१२६ नूसार पोतुबाईने माझे व माझे वडील सोनु दंडाजे विरूद्ध नियमित दि.दा.क्र.८२/१९८३ वणी येथील न्यायालयात दाखल केला होता. हे म्हणने खरे नाही की, त्या प्रकरणातील दावा समन्स ''सुर्या सोनु दडांजे'' या नावानेच मी स्विकारले. हे म्हणने खरे नाही की, सदरहू दिवाणी प्रकरणात मी उपरोक्त नावानेच दावा समन्स स्विकारले कारण ते माझे कायमस्वरूपी नाव आहे. हे म्हणने खरे नाही की, मी दत्तकपूत्र नसल्यामूळेच ''सुर्या सोनु दडांजे'' या नावाने दावा समन्स स्विकारले.

२२. हे म्हणने खरे नाही की, पोतुबाई जिवंत असेपर्यंत दावा मिळकत गट क्र. १३ ची एकमेव मालक होती आणि त्यावर माझा कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार नाही. हे म्हणने खरे नाही की, पोतुबाईने मालकीन्वये दावा मिळकतीची खरेदीखत नि.क्र.११५ प्रतिवादी क्र. २ च्या हक्कात करून दिले आणि प्रतिफलाची संपूर्ण रक्कम स्विकारली. हे म्हणने खरे नाही की, सदर खरेदीखतास आव्हान देण्याचा मला कायदेशीर हक्क नाही. हे म्हणने खरे नाही की, माझा दावा कायदेशीरित्या ग्राह्य नाही.

२३.	हे म्हणने खरे नाही की, पोतुबाई माझेसोबत कधीही राहिली नाही. प्रतिवादी क्र. ७ नामे फुल्या कुमरे हा पोतुबाईचा भाचा असल्याचे मला माहित नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, तो तिचा नौकर होता. मी मौजे माथार्जून (डुबली पोड), ता. झरी या ठिकाणी राहतो. या वादपत्रामधे माझा रहिवास पत्ता तोच आहे. हे म्हणने खरे आहे की, वादपत्र नि.क्र.१ मधे प्रतिवादी क्र. ४ म्हणून पोतुबाईचा राहण्याचा पत्ता रा. बेहाडी पोड, ता. झरी असा नमूद आहे. प्रतिवादी क्र. ७ हा मौजे बेहाडी पोड येथील रहिवासी आहे. हे म्हणने खरे नाही की, प्रतिवादी क्र. ७ हा पोतुबाईचा भाचा होता, ते दोघेही एकत्र राहत होते आणि त्यानेच तिचे शेवटपर्यंत पालनपोषण व संगोपन केले. हे म्हणने खरे नाही की, प्रतिवादी क्र.७ यानेच पोतुबाईची उत्तरक्रिया केली.

२४.	हे म्हणने खरे नाही की, प्रतिवादी क्र. ८ हा सुद्धा पोतुबाईला औषधपाणी देवून मदत करीत होता. हे म्हणने खरे नाही की, मयत पोतुबाईने संतुष्ट होवून सुस्थितीत, चांगले शारिरिक व मानसिक स्थितीमधे प्रतिवादी क्र. ७ व ८ यांच्या हक्कामधे जमिन गट क्र. १३ व गट क्र. ५९ या मिळकतीसंबंधी दिनांक २४.१०.२००८ रोजी दुय्यम निबंधंक झरी यांचे कार्यालयात नोंदणीकृत ईच्छापत्र अनुक्रमांक ५२९/२००८ करून दिले. हे म्हणने खरे नाही की, सदरहू ईच्छापत्र पोतुबाईने स्वेच्छेने साक्षीदार नामे दिलीप नानाजी कोडापे आणि सुदाम बापूराव सोयाम यांच्या समक्ष करून दिले. हे म्हणने खरे नाही की, पोतुबाईच्या सांगण्याप्रमाणे व साक्षीदारांसमक्ष अर्जनवीस श्री कोडापे यांनी सदरहू ईच्छापत्र लिहिले. हे म्हणने खरे नाही की, सदर ईच्छापत्राधारे पोतुबाईने तिचे प्रतिवादी क्र. ६ बॅक खात्यामधे जमा असलेली रक्कमसुद्धा प्रतिवादी क्र. ७ व ८ यांना दिली. हे म्हणने खरे नाही की, सन २००८ मधे मी महाराष्ट राज्य १६० वणी विधानसभा मतदारसंघ, डुबली पोड, माथार्जून या ठिकाणी मी ‘‘अय्या सोनु दडांजे’’ या नावाने मतदान केले. माझे पत्नीचे नाव चिन्नाबाई असे आहे. माझे भावाचे नाव हनुमंत आहे. हे म्हणने खरे नाही की, सदरहू मतदार यादीमधे माझे वडीलांचे नाव अनुक्रमांक ५५३, भावाचे अ.क्र. ५५४ आणि पत्नीचे अ.क्र. ५५७ वर आहे. हे म्हणने खरे आहे की, पोतुबाईचे नाव डुबली पोड मतदार यादीमधे नाही. हे म्हणने खरे नाही की, पोतुबाईसोबत माझा कोणत्याही

नात्यागोत्याचा संबंध नाही. हे म्हणने खरे नाही की, पोतुबाईची मालमत्ता हडप करण्यासाठी मी हा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणने खरे नाही की, मयत पोतुबाईचे कायदेशीर प्रतिनिधी केवळ प्रतिवादी क्र.७ व ८ अथवा प्रतिवादी क्र. ४–अ व ४–ब हेच आहेत. हे म्हणने खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी प्रतिवादी क्र. १, २, ३, ५ व ६ तर्फे उलटतपासणी** :–

२५. सदरहू प्रतिवादी व त्यांच्या विधीज्ञांचा पुकारा केला असता, गैरहजर. त्यांच्यातर्फे अर्जही दाखल नाही. करीता उलटतपास नाही.

सा.वा.दा.ब.अ.क.केले.

Digitally signed by Sahebrao Shesharao Budruk
Date: 2020.01.17 16:59:09 +0530

**(सा.शे. बुद्रूक)**
दिवाणी न्यायाधीश (व.स्तर.),
केळापूर.
दिनांक १७.०१.२०२०

समक्ष,

Digitally signed by Sahebrao Shesharao Budruk
Date: 2020.01.17 16:59:16 +0530

**(सा.शे. बुद्रूक)**
दिवाणी न्यायाधीश (व.स्तर.),
केळापूर.